स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य विद्याशाखेतील इतिहास विषयातील पीएच्.डी

पदवीसाठी सादर केल्या जाणाऱ्या शोधप्रबंधाचा आराखडा

संशोधन विषय

महात्मा गांधी यांच्या विचार व कार्याचा निवडक आंतरराष्ट्रीय व्यक्तींवरील प्रभाव

(१९१५ - २०१५)

संशोधक

चिकटे व्यंकट दगडू

एम.ए., बी.एड., सेट.

मार्गदर्शक

प्रा. डॉ. ओ. व्ही. लिगाडे

एम. ए., एम.फिल., पीएच. डी.

इतिहास विभाग प्रमुख, शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव,

ता. चाकूर जि. लातूर

संशोधन केंद्र

पानसरे महाविद्यालय, अर्जापूर जि. नांदेड.

मे. २०१९

महात्मा गांधी यांच्या विचार व कार्याचा निवडक आंतरराष्ट्रीय व्यक्तीवरील प्रभाव

(१९१५ - २०१५)

प्रस्तावनाः

सत्य, अहिंसा आणि शांतीचा संदेश देणाऱ्या महात्मा गांधीनी संपुर्ण जगाला आपल्या विचारांची भुरळ पाडली आहे. आपली आत्मकथा 'माझे सत्याचे प्रयोग' मधून सतःच्या जीवनात घडलेल्या सर्व सत्य गोष्टी अगदी निसंकोचपणे मांडून जगासमोर एक मोठा आदर्श ठेवण्याचे काम म. गांधी यांनी केले आहे. त्यांनी स्वतः आचरण करून मग लोकांना उपदेश केल्याने त्यांच्या चुकांकडे बोट ठेवायला लोकांना फारशी संधीच मिळाली नाही. नेमका हाच आदर्श गुण भारतातील व भारताबाहेरील जगातील अनेक थोर व्यक्तींनी गांधीजींच्या विचारांची व कार्याची प्रेरणा घेवुन ते विचार आपल्या काळात किती आणि कसे सुसंगत आहेत याचे महत्व लक्षात घेता अनेक चळवळी निर्माण केल्या आहेत. या आधारेच स्वतःच्या देशात, जगात बदल घडवण्याचा प्रयत्न केला आहे. यापैकी काही निवडक नावे घ्यायची तर नेल्सन मंडेला, युसूफजाई मलाला, ॲगसान सु.की, बराक ओबामा, मुजीबर रहेमान, खान अब्दुल गफार खान, अण्णा हजारे अशी अनेक नावे समोर येतात. याशिवाय अनेक देशातील विविध विद्यापीठांनी म.गांधी विचार हा अभ्यासक्रम सुरू केला आहे. यातुन गांधी विचारांची व्याप्ती किती मोठी आहे हे लक्षात येण्यास मदत होते.

भारतीय स्वातंत्र्याचे शिल्पकार असे महात्मा गांधी यांना म्हटले जाते. आपल्या अहिंसात्मक आंदोलनाच्या माध्यमातून या देशाला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या महात्मा गांधीजींचा जन्म २ ऑक्टोबर १८६९ रोजी गुजरातमधील पोरबंदर येथे झाला. शालेय शिक्षण संपल्यानंतर म. गांधी १८८८ मध्ये कायद्याचे शिक्षण घेण्यासाठी इंग्लंडला गेले. तेथे त्यांनी बॅरीस्टर ही पदवी मिळवली. १८९१ मध्ये भारतात परतल्यानंतर त्यांनी वकिलीला सुरूवात केली. पण आयुष्याने आचानक एक वेगळे वळण घेतले आणि ते वकिली करण्यासाठी आफ्रिकेला गेले. तेथे वकिली सुरू केली. आफ्रिकेत राहून वकिली करत असताना भारतीय लोकांच्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठीचे कार्य हाती घेतले व त्यांना त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी अहिंसात्मक आंदोलनाद्वारे ही चळवळ चालू ठेवली. याचा प्रभाव आफ्रिकन लोकांवर व भारतीय लोकांवर पडायला सुरूवात झाला. 'सत्याचे प्रयोग' ही त्यांनी तेथेच सुरू केले. तेथील लोकांमध्ये लोकजागृती होण्यासाठी १९०३ मध्ये 'इंडियन ओपीनियन' नावाचे वृत्तपत्र सुरू केले तसेच सत्याग्रह शिबिराची स्थापनाही केली. १९१४-१५ साली ते भारतात परतले.

१९१५ पासून भारतातील त्यांच्या कार्याला सुरूवात झाली १९१७ साली चंपारण्य येथील शेतकऱ्यांच्या हक्कासाठी आंदोलन केले. पुढे १९२० साली 'असहकार आंदोलन' केले ते १९२२ पर्यंत यशस्वीपणे चालले. परंतू

एका हिंसात्मक घटनेमुळे त्यांना ते आंदोलन स्थगित करावे लागले. पुढे १९३० साली 'सविनय कायदेभंग' करून ब्रिटीश सरकारचे लक्ष भारतीय समस्येकडे व भारतीय अन्यायाकडे वेधण्याचा प्रयत्न केला. पुढे १९४२ साली 'चलेजाव चळवळ' करून ब्रिटीशांना भारताला स्वातंत्र्य देण्यास भाग पाडले. या कामात त्यांना अनेक वेळा उपोषणाचा मार्गही अवलंबवावा लागला पण याची त्यांनी कधीही पर्वा केली नाही. अशा या महान व्यक्तीस भारताचा 'राष्ट्रपीता' म्हणून गौरवण्यात आम्हा भारतीयांना अभिमान वाटतो.

म. गांधी केवळ अट्टल राजकारणीच नव्हते तर जीवनाच्या विविध पैलूवर त्यांचा चांगलाच प्रभाव होता. ते चांगले समाज सुधारक व कुशल अर्थतज्ञ होते. त्यांचा उत्कृष्ट जनसंपर्कही होता. त्यांनी आपल्या विचारांची लाट गावागावात आणि शहराशहरात पोंहचवली. त्यांच्या सरळ, साध्या व सोप्या भाषेचा प्रभाव लाखो लोकांवर पडत असे. म.गांधी नेहमी म्हणत असत की, "व्यक्तीचा प्रमुख संघर्ष आतून असतो व ती आतील शक्ती आपणास नेहमी प्रेरणा देत असते व हे कार्य वृत्तमानपत्र चांगल्या प्रकारे करू शकतात" म्हणुनच त्यांनी आपल्या पत्रकारीतेच्या माध्यमातून सामाजिक, आर्थिक व राजकीय विचार मांडले. याचा परिणाम असा झाला की, तत्कालीन बुद्धीवंत वर्गाने म्हणजेच वकील, शिक्षक, विद्यार्थी, पत्रकार, इत्यादींनी म.गांधी यांना आपले प्रेरणा स्थान मानायला सुरूवात केली. म्हणूनच सुप्रसिध्द वैज्ञानिक अल्बर्ट आईन्सटाईन यांनी म्हटले होते की, "गांधी नावाची हाडामासाची व्यक्ती अस्तित्वात होती, यावर नवीन पिढीचा विश्वासच बसणार नाही कारण असा आदर्श पुरूष पुन्हा होणे नाही" म.गांधीनी आपल्या आयुष्याच्या वाटचालीत ग्रामस्वराज्य, गामोद्योग, पर्यावरण, आरोग्य, सर्वधर्म समभाव अशा अनेक विषयांवर मांडलेली मते आजच्या बदलत्या काळात सुसंगत असल्याचे दिसून येतात. संयुक्त राष्ट्रसंघाच्या पर्यावरण विषयक आंतरराष्ट्रीय परिषदेतही वेळोवेळी गांधी विचाराला महत्व देण्यात आले आहे. संयुक्त राष्ट्रसंघानेच निश्चित केलेले 'संस्टेनेबल डेव्हलपमेंट गोल्स' चा आधारही गांधी विचारातच दडला आहे.

असे मानले जाते की, दोन महायुद्धात झाला नसेल इतका सामाजिक, सांस्कृतिक, आणि राजकीय विध्वंस गेल्या पंचवीस वर्षात जागतिकीकरणाच्या काळात झालेला आहे. यातूनच उद्‌भवलेल्या भांडवलशाहीने जगभरातील शेवटच्या गरीब आणि सामान्य माणसांच्या अस्तित्वालाच हानी पोहंचवल्याने या भीषण कालखंडात नेल्सन मंडेलापासून ते बराक ओबामापर्यंतच्या विवेकशील नेत्यांना फक्त एकच आशेचा किरण दिसला, तो म्हणजे म.गांधी. चोर पावलांनी येत असलेली धार्मीक आक्रमकता आणि क्रुर राष्ट्रवाद यांना गांधीवाद हेच उत्तर असल्याचे जाणवू लागल्याने अनेक उच्चशिक्षीत असोत वा शास्त्रज्ञ यांना विद्यापीठांतून शिकविले जाणारे म.गांधीजींचे विचार जवळचे वाटायला लागले आहेत.

विषयाची निवडः

म. गांधी यांच्या विचार व कार्याचा निवडक आंतरराष्ट्रीय व्यक्तीवरील प्रभाव (१९१५-२०१५)' हा विषय निवडीचा उद्देश म्हणजे म. गांधीजींच्या विचाराचा व कार्याचा प्रभाव भारतात व भारताबाहेरही खूप मोठ्या प्रमाणात निर्माण होऊन अनेक मोठ-मोठ्या चळवळी, आंदोलने व विविध समाजोपयोगी कार्य झाली. तेही आगदी शांततेत व नि:शस्त्र पद्धतीने. म.गांधी विचारांची थोरवी अनेक समाजसुधारकांच्या लक्षात आल्याने त्यानीं त्यातून प्रेरणा घेऊन सत्य, अहिंसा, न्याय या तत्वाने काम करण्याचा प्रयत्न केला आहे. म.गांधीजींचे विचार सामाजिक व मानवी जीवनाची प्रगती होण्यासाठी अत्यंत मौलीक आहेत. यामध्ये खेड्यांकडे चला, पर्यावरण, आरोग्य, शिक्षण, स्वच्छता अशा विविध स्तरावर त्यांनी आपले विचार मांडले नव्हे; तर प्रत्यक्षात उतरवण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या याच कार्याचा व विचारांचा प्रभाव माझ्याही मनावर निर्माण होऊ लागल्याने त्यांच्या विचारांची जिज्ञासा माझ्या मनात निर्माण झाली. तसेच म.गांधी यांच्या विचार व कार्याचा निवडक आंतरराष्ट्रीय व्यक्तीवरील प्रभाव या विषयावर कोणत्याही प्रकारचे संशोधन झाल्याचे निदर्शनात न आल्याने प्रस्तूत विषय संशोधनासाठी निवडण्यात आला आहे.

म. गांधीजींचे हे विचार व कार्य फक्त भारतापुरतेच मर्यादित राहीले नाहीत तर भारताबाहेरही अनेक देशातील व्यक्तींवर त्याचा प्रभाव पडल्याचा दिसतो. अनेक व्यक्तींनी हे विचार स्विकारून स्वत:मध्ये व देशामध्ये मोठे क्रांतीकारक बदल घडवून आणले आहेत. त्यांच्या विचारंची दखल संयुक्त राष्ट्रसंघानेही घेतली आहे. म. गांधीजींच्या नावने अनेक शांतता पुरस्कार देखील देण्यात येऊ लागले आहेत. असा हा थोर राष्ट्रपीता माझ्या देशात जन्माला आला हे आमचे थोर भाग्यच म्हणावे लागेल. त्याच्या आफ्रिकेतून परतल्यापासून ते १९४८ पर्यंत भारतात अनेक चळवळीच्या माध्यमातून लोकांना ब्रिटीश राजवटीतून मुक्त करण्याचे व भारताला स्वांतत्र्य मिळवून देण्याचे महान कार्य म. गांधीनी केले होते. यासाठी त्यांना अनेक वेळा तुरूंगवासही भोगावा लागला; पण देशासाठी यांची त्यांनी कधीही पर्वा कीली नाही. त्याच्या ह्या चळवळी फक्त भारतापुरत्या मर्यादीत न राहता भारताबाहेर सुध्दा अनेक ठिकाणी चळवळी केल्याचे पुरावे आपणास पहावयास मिळतात. याच मानवतावादी विचारांचा प्रभाव जगाच्या कानाकोपऱ्यात अनेक लोकांवर निर्माण झाल्याने हा विषय घेऊन संशोधन करणे महत्वाचे वाटले.

संशोधन विषयाची उदिष्ट्येः

म. गांधी यांच्या विचार व कार्याचा निवडक आंतरराष्ट्रीय व्यक्तीवरील प्रभाव (१९१५-२०१५) या संशोधन विषयाचा अभ्यास करताना पुढील उद्देश समोर ठेवले आहेत.

१. म.गांधीजींच्या विचारांचा प्रभाव व व्याप्ती जाणून घेणे.

२. गांधी विचारांचा व कार्याचा प्रभाव समाजमनावर कसा पडत गेला याची माहीती घेणे.

३. आतंरराष्ट्रीय स्तरावर गांधीच्या विचारांचा परिणाम जाणून घेणे.

४. आतंरराष्ट्रीय संघटनांनी व देशांनी स्विकारलेला म. गांधींचा विचार व त्यातुन निर्माण झालेला प्रभाव तपासणे.

५. आंतरराष्ट्रीय स्तरावर कोणकोणत्या व्यक्तींवर गांधी विचारांचा प्रभाव पडत गेला व त्याचे परिणाम काय होत गेले हे जाणून घेण.

संशोधन विषयाचे महत्व / व उपयोगिता:

१. म.गांधी यांच्ये विचार व कार्य आजच्या काळात कीती उपयुक्त आहेत हे लक्षात आणता येईल.

२. जागतीक स्तरावर म.गांधी विचाराचा प्रभाव किती प्रमाणात आहे व त्याचा प्रभाव कुठपर्यंत पोंहचला आहे हे माहीती करून घेता येणार आहे.

३.अशांततेकडे जाणाऱ्या जगाला शांततेकडे नेण्यास म.गांधी विचार जागतीक स्तरावर कोणकोणत्या देशाने आंगीकारला याची ओळख करून घेणे.

४.म. गांधी विचारावर भारतातूनच होत असलेल्या टिका यांना चोख प्रतिउत्तर देणारे जागतिक स्तरावरील विचारवंत माहीती करून घेता येते.

संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा:

म. गांधी यांच्या विचार व कार्याचा निवडक आंतरराष्ट्रीय व्यक्तीवरील प्रभाव (१९१५-२०१५) हा विषय निवडताना १०० वर्षाचा कालावधी व काही निवडक व्यक्तींचा आढावा या संशोधनात घेण्यात येणार आहे. कारण म. गांधीचे विचार व कार्य जागाच्या कानाकोपऱ्यातील अनेक देशांनी, व्यक्तींनी व विविध देशातील विद्यापीठांनी स्विकारले आहेत. म. गांधीजींचे विचार २०१५ च्या नंतर व पुढेही कित्येक वर्ष चालूच राहतील व त्यांच्या विचारांकडून प्रेरणा घेऊन भारतातही व भारताबाहेरही अनेक व्यक्ती व नेत्यांनी, देश विकासाच्या मार्गाकडे नेण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. या सर्वांचा आढावा घ्यायचा म्हटला तर विषयाची व्याप्ती खुप मोठी होऊ शकते. यासाठी काही निवडक व्यक्तींचाच आढावा या संशोधनात घेण्यात येणार आहे.

गृहितके/परीकल्पना:

१. म. गांधीजींच्या विचार व कार्यातून अनेक व्यक्तींनी आपापल्या देशात देशहिताच्या सुधारणा घडवुन आणल्या.

२. सत्य, अहिंसा, न्याय याचा आग्रह हुकूमशाही राष्ट्रात रूजवण्याचे काम गांधी विचार व कार्याने केले.

३. आजच्या काळात म. गांधीचे शिक्षण, पर्यावारण, आरोग्य, स्वच्छता इ. विचारांची जागाला गरज आहे.

४. म. गांधी विचार व कार्याच्या पाऊलावर पाऊल ठेवून कार्य करणाऱ्या जगातील अनेक व्यक्तीस पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

५. अनेक राष्ट्रांनी आपल्या विद्यापीठातून म.गांधीचे विचार आभ्यासक्रमात ठेवले आहेत.

६. म. गांधी यांचे विचार व कार्याचा प्रभाव जागतिक पातळीवर अनेक व्यक्तींवर पडून त्यांनी गांधी मार्गाने वाटचाल केल्याचे दिसून येते

संशोधन पद्धती:

संशोधन म्हणजे ज्ञानाची पातळी वाढवण्यासाठी एखाद्या विषयाचा पद्धतशीरपणे केलेला अभ्यास होय. यामध्ये सत्याची तपासणी, आधी सापडलेल्या तत्वांची पुष्टी, नवीन विषयाचा अभ्यास इ. बाबींची पडताळणी केली जाते. याच बाबींचा आधार घेऊन प्रस्तूत विषयाचे संशोधन करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

म.गांधी यांच्या विचार व कार्याचा निवडक आंतरराष्ट्रीय व्यक्तीवरील प्रभाव(१९१५-२०१५) या संशोधन विषयाच्या संशोधन कार्यासाठी इतिहासातील दुय्यम संदर्भ साधनांचा, विश्लेषनात्मक, वर्णनात्मक व निरीक्षण पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे. तसेच म. गांधी विचार व कार्यने प्रभावित होवून जीवन जगत असलेल्या व्यक्तींच्या मुलाखती घेऊनही संशोधन विषयाची मांडणी करण्यात येणार आहे.

त्याच बरोबर संशोधन करताना चरित्रग्रंथ, पत्रे, आत्मचरित्र, फोटो, शासकीय कागदपत्रे, संदर्भग्रंथ, नियतकालिके व गॅझेटीयर यांचा उपयोग संशोधनासाठी करण्यात येणार आहे.

पुर्वसुरींचा आढावा:

म. गांधी यांना केंद्रस्थानी ठेवून वेगवेगळ्या पैलूने संशोधन करण्यात आले आहे.

१. देशपांडे श्रीपाद कमलाकर,आधुनिक संदर्भात म. गांधीजींच्या सामाजिक तत्वज्ञानाचे तात्विक विश्लेषन,

२. उबाळे प्रेरणा विलास, हिंदी नाट्य साहीत्य में प्रतिबिंबीत म. गांधी का व्यक्तित्व और दर्शन एक अभ्यास.

३. Pal, Raj, Narayan, Gandhi and the modern review.

४. Nain Sulochana,Mahatma Gandhi social justice.

५. Modarresin, Mohammad Ali,Gandhiji on the harmony of religions a critical study.

६. सिंग राम प्रसाद, गांधी और आंबेडकर चिंतन और कर्तृत्व एक तुलनात्मक विवेचन

७. धाके राजेंद्र साहेबराव, गांधी - आंबेडकर याची सत्याग्रह चळचळ एक चिकीत्सक अभ्यास.

८.Christudhas M., Martin Luthuar and Mahatma Gandhi a Comparative study.

९. सिंग प्रियंका, आधुनिक समाज में गांधीजीके विचारोंकी उपयोगिता एक मुल्यांकन.

१०. डॉ. शिंदे सर्जेराव, म.गांधी आणि पुणे करार.

याशिवाय इतरही संशोधनाचा व संदर्भ साहीत्याचा मागोवा घेण्यात येणार आहे.

प्रकरण योजना:

प्रकरण पहिले: म. गांधी यांचे प्रारंभिक जीवन

या प्रकरणात महात्मा गांधी यांच्या जन्मापासून ते बालपण, शैक्षणीक वाटचाल, वैवाहिक जीवन, जीवनातील विविध महत्वपूर्ण प्रसंग, उच्च शिक्षण, आलेले विविध प्रकारचे अनुभव इत्यादी त्यांच्या जडणघडणीबद्दलचा थोडक्यात अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे: म. गांधी यांचे विचार

या प्रकरणात म. गांधी यांच्या विचारांचा भारतीय समाजमनावर व जागतिक पातळीवरील विविध क्षेत्रात मग ते पर्यावरण असो अथवा आरोग्य, शिक्षण, ग्रामविकास, जागतीक शांतता, अहिंसा, स्वच्छता इत्यादी त्यांच्या विचारांचा थोडक्यात अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे: म. गांधी यांचे कार्य

या प्रकरणात म. गांधींच्या कार्याचा उदा: आफ्रिकेतील कार्य, ब्रिटीशांच्या अन्यायकारक कर प्रणाली विरोधात केलेली शेतकरी आंदोलने, कामगार संप, विविध अन्यायकारक कायद्यांना विरोध, सविनय कायदे भंग, असहकार अंदोलन, सामाजिक क्षेत्रातील कार्य यांचा संक्षिप्त आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे: म. गांधी यांचे विचार व कार्याचा आंतरराष्ट्रीय व्यक्तीवरील प्रभाव

या प्रकरणात म. गांधी यांच्या विचाराने व कार्याने प्रभावित होऊन त्यांच्या निधनापूर्वी व निधनानंतरही अमेरीकेचे माजी राष्ट्राध्य बराक ओबामा, युसूफजाई मलाला, नेल्सन मंडेला, मुजीबूर रहेमान, खान अब्दुल गफार खान, मेडेलीन स्लेड उर्फ मीराबेन, ॲग सान सु.की., अण्णा हजारे या व अशा इतर अनेक व्यक्तींनी गांधी विचार कार्य अंगीकारून विविध राजकीय व सामाजिक परिर्वतन घडवून आणले त्यापैकी निवडक व्यक्तींचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणात करण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे: निष्कर्ष

वरील सर्व प्रकरणांचा अभ्यास करून येणारे निष्कर्ष या प्रकरणात मांडण्यात येणार आहेत.

संदर्भसुची:

१. देव प्रभाकर, (२००७)इतिहासशास्त्र संशोधन, अध्यापन आणि लेखनपरंपरा, ब्रेन टॉनिक प्रकाशन, नाशिक,.

२. खरे ग.ह. संशोधकाचा मित्र, पुणे भारत इतिहास संशोधन मंडळ.

३. कार ई.एच. (अनुवाद: वि.गो. लेले) (१९९४), इतिहास म्हणजे काय ?, पुणे कॉन्टिनेन्टन.

४. आगलावे प्रदीप- संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, विद्या प्रकाशन, नागपूर.

५. कुंभार नागोराव, सत्याग्रह म. गांधीजींचा दृष्टीकोन, प्रबोधन प्रकाशन लातूर.

६.गांधी मो.क., सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा, अनुवादक- सीताराम पुरूषोत्तम पटवर्धन, नवजीवन प्रकाशन मंदिर अहमदाबाद.

७.दळवी अजीत, गांधी विरूद्धत गांधी, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

८.धर्माधिकारी भाऊ (संपा), (१९९५) गांधी विचार दर्शन धर्मविचार (भाग २रा) खंड १७ वा. महाराष्ट्र गांधीस्मारक निधी प्रकाशन, गांधीभवन, कोथरूड, पुणे. आवृत्ती दुसरी.

९. .धर्माधिकारी भाऊ (संपा), (१९९४) गांधी विचार दर्शन धर्मविचार (भाग १ला) खंड १६ वा. महाराष्ट्र गांधीस्मारक निधी प्रकाशन, गांधीभवन, कोथरूड, पुणे. आवृत्ती दुसरी.

१०.धर्माधिकारी भाऊ (संपा), गांधी विचार दर्शन स्वराज्य सत्यागृह, खंड १५ वा. महाराष्ट्र गांधीस्मारक निधी प्रकाशन, गांधीभवन, कोथरूड, पुणे.

११. बोस निर्मलकुमार, गांधीः कार्य व विचारप्रणाली, महाराष्ट्र राज्य साहित्य सांसकृतिक मंडळ, मुंबई.

१२. भारदे बाळासाहेब, (१९९५)प्रकाशक-गांधी विचार दर्शन जातीय ऐक्य खंड १० वा, महाराष्ट्र गांधी स्मारक निधी, प्रकाशन, गांधीभवन, कोथरूड, पुणे.

१३. सोर वासंती, एकविसाव्य शतकात गांधी, परमधाम प्रकाशन, पवनार.

१४. जैन माणक, गाँधी के विचारो की २१ वीं सदी में प्रासंगिकता, आदि पब्लिकेशन, जयपूर, भारत.

१५. रामजीसिंह (संपा) गांधी और भावी विश्व व्यवस्था, कॉमनवेल्थ, नई दिल्ली.

१६. G. Ranjit Sharma, An Introduction to Gandhian Thought Atlantic Publishers and Distributers, Delhi.

१७. Guha Ramachandra, (२०१८) GANDHI The Years that Change the World १९१४ ङ १९४८, Allen Lane Publishers, UK.

१८. महात्मा गांधींचे संकलीत वाङ्मय, महात्मा गांधी संकलीत वाङ्मय भाषांतर समिती, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

संशोधक

चिकटे व्यंकट दगडू
एम.ए.,बी.एड, सेट.,
मु.पो. ता. लोहारा, जि. उस्मानाबाद.

संशोधक मार्गदर्शक

प्रा. डॉ. ओ. व्ही. लिगाडे,
एम. ए., एम.फिल., पीएच. डी.,
इतिहास विभाग प्रमुख, शिवजागृती महाविद्यालय,
नळेगाव, ता. चाकूर जि. लातूर.